जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
3 APR 2018
सकाळ



कोल्हापूर : ऋद्धी राजेंद्र जगताप हिने शिवाजी विद्यापीठात सूक्ष्मजीवशास्त्र विषयात पहिला क्रमांक मिळवला. तिला निर्मला केळवकर शिष्यवृत्ती व फेलोशिप मिळाल्याबद्दल इस्रोचे माजी अध्यक्ष ए. एस. किरणकुमार यांच्या हस्ते तिचा सत्कार झाला.

जनसंपर्क कक्ष
3 APR 2018
Times of India
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# SUK drafts CBCS structure, exam dept to suggest tweaks

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) is set to implement the Choice Based Credit System (CBCS), which allows students to take interdisciplinary subjects along with their regular courses.

Pro-vice-chancellor D T Shirke on Monday said the CBCS structure is ready and has been forwarded to the exam department for possible tweaks in their software system.

"We are committed to bringing positive changes in the academics and CBCS is one of them. The structure is ready to be implemented, but it will also need to be synchronised with the exam department. We have forwarded the overall implementation plan to the department and are hoping to get their feedback soon," he said.

He said that once the feedback from the exam department is received, the SUK will start convening meetings with the stakeholders in three Sangli, Satara and Kolhapur districts later this month.

Shirke said that for the implementation of CBCS, the nod of board of studies members will also be taken into consideration.

On the CBCS, a SUK official said that it will be able to provide flexible learning approach for students. "Under CBCS, a student can take interdisciplinary subjects along with their regular courses.

For instance, a science undergraduate student can choose to study subjects from either arts or commerce streams if he/she wishes."

"Students will be able to opt for courses of their choice and pursue skills to enhance their employability with the help of CBCS," said the official.

"The adaptation of CBCS across the universities would ensure seamless mobility of students as well as transfer and mutual recognition of credits across the higher educational institutions in the country," said the official.

The University Grants Commission (UGC) had asked universities and colleges to submit data on the uniform implementation of the CBCS earlier last year.

In a circular, the UGC had said that it wished to create a database regarding the CBCS implementation in the universities across the country.

## CHOICE-BASED CREDIT SYSTEM

- Students will be able to opt courses of their choice and pursue skills to enhance their chances of employability



- CBCS provides flexible learning approach. Under CBCS, a student can take interdisciplinary subjects along with their regular courses. For instance, an undergraduate student of science can choose to study subjects from either arts or commerce streams

**The structure is ready to be implemented but the possible tweaks need to be discussed with the exam department. Once the exam department gives its feedback, SUK will start convening meetings with stakeholders in Sangli, Satara and Kolhapur districts later this month**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 APR 2018
पुढारी

# ज्ञानकेंद्रीत संशोधन आवश्यक : काकडे

## ‘भारती विद्यापीठ इंजिनिअरिंग’तर्फे परिषद

**कंदलगाव : वार्ताहर**

प्रगत तंत्रज्ञानाच्या जगामध्ये इंजिनिअरिंग क्षेत्रातील विद्यार्थी संशोधकाकडून ज्ञानकेंद्रित संशोधन अपेक्षित आहे. तांत्रिक कौशल्य आत्मसात करून त्याचे उपाययोजन करताना समाजभान असणे आवश्यक आहे. अशी अपेक्षा शिवाजी विद्यापीठ परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी व्यक्त केली. ते भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगतर्फे आयोजित ८ व्या राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

परिषदेच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. विजय घोरपडे होते. या परिषदेमध्ये विविध विषयांवर १३६ शोधनिबंधाचे सादरीकरण झाले. यापैकी निवडक शोधनिबंध ‘इंटरनॅशनल जर्नल ऑफ अॅडव्हान्स रिसर्च इन सायन्स अँड इंजिनिअरिंग’ या यूजीसी मान्यताप्राप्त आंतरराष्ट्रीय नियतकालिकेमध्ये प्रकाशित केले जाणार आहेत. मुख्य समन्वयक प्रा. सतीश कोतवाल यांनी स्वागत केले. आभार व्यवस्थापक प्रा. व्ही. एस. कदम यांनी मानले.

जनसंपर्क कक्ष
3 APR 2018 महाराष्ट्र टाईम्स शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात विविध स्पर्धा

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर



## आंबेडकर संशोधन केंद्रातर्फे आयोजन

शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्यावतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२७ व्या जयंतीनिमित्त पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धा व निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी केले आहे.

निबंध स्पर्धेसाठी, राष्ट्रनिर्माता डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि वैज्ञानिक दृष्टिकोन, अर्थशास्त्रज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आज असते तर? धोरणकर्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर असे विषय आहेत.

निबंध स्पर्धेसाठी शब्दमर्यादा ३००० असून ए-४ कागदाच्या एकाच बाजूस स्वहस्ताक्षरात निबंध लिहावा. स्पर्धकाने १२ एप्रिल रोजी दुपारी ४ वाजेपर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रात निबंध जमा करणे आवश्यक आहे. प्रथम क्रमांकासाठी रोख रुपये एक हजार व प्रमाणपत्र, द्वितीय क्रमांकासाठी रोख रुपये सातशे पन्नास व प्रमाणपत्र, व तृतीय क्रमांकासाठी रोख रुपये पाचशे व प्रमाणपत्र अशी पारितोषिके देण्यात येणार आहेत.

पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धेसाठी राष्ट्रनिर्माता डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि राष्ट्रनायक राजर्षी छत्रपती शाहू महाराज, छत्रपती शिवाजी महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि वैज्ञानिक दृष्टिकोन, आधुनिकतेचे प्रतीक डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सामाजिक लोकशाही असे विषय आहेत.

या स्पर्धेसाठी पोस्टर एक मीटर लांब व एक मीटर रुंद असावे. स्पर्धेत भाग घेण्यासाठी इच्छुकांनी १२ एप्रिलपर्यंत संशोधन केंद्रात नावनोंदणी करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे स्पर्धकाने १३ एप्रिल रोजी सकाळी साडेदहा वाजता केंद्रात पोस्टरसह उपस्थित राहणे आवश्यक आहे. या संदर्भात अधिक माहितीसाठी ०२३१- २६०९३९६ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
3 APR 2018
पुढारी

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त विद्यापीठात निबंध, पोस्टर स्पर्धा

**कोल्हापूर (प्रतिनिधी) :** शिवाजी विद्यापीठाच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२७ व्या जयंतीनिमित्त पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धा व निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. निबंध स्पर्धेसाठी शब्दमर्यादा असून स्पर्धकांनी १२ एप्रिलपर्यंत निबंध जमा करणे आवश्यक आहे. पोस्टर प्रेझेंटेशन स्पर्धेसाठी पोस्टर एक मीटर लांब व एक मीटर रुंद असणे महत्त्वाचे आहे. स्पर्धेत भाग घेण्यासाठी दि. १२ पर्यंत नावनोंदणी करावी. त्याचप्रमाणे स्पर्धकांनी १३ एप्रिल रोजी सकाळी साडेदहा वाजता पोस्टरसह डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्रात उपस्थित राहणे आवश्यक आहे. विजेत्यांना रोख रक्कम व प्रमाणपत्र अशी पारितोषिके दिली जाणार आहेत, अशी माहिती केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी दिली आहे.

3 APR 2018 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# १८ अभ्यास मंडळ अध्यक्षपदांच्या निवडी बिनविरोध

## शिवाजी विद्यापीठात सहा जागा रिक्त; मराठी, अर्थशास्त्र अभ्यास मंडळासाठी मतदान

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या अभ्यास मंडळांच्या अध्यक्षपदाच्या निवडीची प्रक्रिया होऊन १८ मंडळांच्या अध्यक्षांच्या जागा बिनविरोध झाल्या. तर समाजशास्त्र, मानसशास्त्र, प्राणिशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र, सिव्हिल इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी, इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी या विभागातील अध्यक्षपदाच्या जागा रिक्त आहेत.

विद्यापीठाच्या अभ्यास मंडळाच्या अध्यक्षपदाच्या निवडीची प्रक्रिया नुकतीच पार पडली. निवडणूक निर्णय अधिकारी तथा कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी निवडणुकीचा निकाल व बिनविरोध अभ्यास मंडळाच्या अध्यक्षांच्या नावांची यादी जाहीर केली आहे.




### समान मते पडल्याने चिठ्ठीद्वारे विजय घोषित

मराठी अभ्यास मंडळ अध्यक्षपदाच्या निवडणुकीत डॉ. दत्तात्रय पाटील आणि डॉ.उदय जाधव या दोन्ही उमेदवारांना समान मत पडल्याने चिठ्ठ्या टाकण्यात आल्या. यात डॉ. दत्तात्रय पाटील विजयी झाले. अर्थशास्त्र अभ्यास मंडळाच्या निवडणुकीत डॉ. अनिलकुमार वावरे आणि डॉ. निवास जाधव यांच्या लढत झाली. १० विरुद्ध ० या मताच्या फरकाने डॉ. वावरे विजयी झाले.

**बिनविरोध अध्यक्ष पुढीलप्रमाणे**

**मानवविज्ञान अभ्यास विद्याशाखा :** डॉ. राजेंद्र भोसले (हिंदी), डॉ. संभाजी भांबर (इंग्लिश अँड लिंग्विस्टिक), प्रा. डॉ. भारती पाटील (राज्यशास्त्र), डॉ. अवनिश पाटील (इतिहास). **विज्ञान व तंत्रज्ञान विद्या शाखा :** प्रा. डॉ. एस. एच. ठकार (गणित), प्रा. डॉ. डी. एन. काशीद (संख्याशास्त्र), प्रा. डॉ. पी. एस. पाटील (पदार्थ विज्ञान), प्रा. डॉ. जी. एस. गोकावी (केमिस्ट्री अँड केमिकल इंजिनिअरिंग), डॉ. अख्तर शेख (इलेक्ट्रॉनिक्स सायन्स, इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी), प्रा. डॉ. डी. के. गायकवाड (वनस्पतीशास्त्र), डॉ. संभाजी शिंदे (भूगोल व भूगर्भशास्त्र), डॉ. अशोक पिसे (मेकॅनिकल इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी), डॉ. हरिनाथ मोरे (फार्मसी). **आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्या शाखा :** डॉ. एस. व्ही. काळेबाग (शिक्षणशास्त्र). **वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा :** प्रा. डॉ. ए. एम. गुरव (कॉमर्स), डॉ. सारंग भोला (मॅनेजमेंट), प्रा. एस. एस. महाजन (अकौंटन्सी), डॉ. डी. के. मोरे (बिझनेस इकॉनॉमिक्स)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
3 APR 2018
महाराष्ट्र टाईम्स

# १८ अभ्यास मंडळाच्या अध्यक्ष निवडी बिनविरोध

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या विद्याशाखांमधील अभ्यास मंडळाच्या अध्यक्षपदाची निवडणूक पार पडली. यामध्ये १८ अभ्यास मंडळाच्या अध्यक्षांच्या निवडी बिनविरोध झाल्या. सहा जागा रिक्त राहिल्या आहेत.

यामध्ये प्रा. डॉ. एस. एच. ठकार (गणित), डी. एन. काशीद (संख्याशास्त्र), पी. एस. पाटील (पदार्थविज्ञान), जी. एस. गोकावी (केमिस्ट्री अँड केमिकल इंजिनीअरिंग), अख्तर मोहंमद शेख (इलेक्ट्रॉनिक्स), डी. के. गायकवाड (वनस्पतीशास्त्र), संभाजी शिंदे (भूगोल व भूगर्भशास्त्र),अशोक पिसे (मेकॅनिकल इंजिनीअरिंग), एस. व्ही. काळेबाग (शिक्षणशास्त्र), हरिनाथ मोरे (फार्मसी), ए. एम. गुरव (कॉमर्स), सारंग भोला (मॅनेजमेंट),एस. एस. महाजन (अकाउंटन्सी), डी. के. मोरे (बिझनेस इकॉनॉमिक्स), संभाजी भांबर(इंग्लिश व लिंग्विस्टीक), भारती पाटील (राज्यशास्त्र), अवनीश पाटील(इतिहास) यांची निवड बिनविरोध झाली.

प्राणीशास्त्र, इलेक्ट्रिकल इंजिनीअरिंग अँड टेक्नॉलॉजी, समाजशास्त्र, मानसशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र , सिव्हील इंजिनीअरिंग अँड टेक्नॉलॉजी या मंडळावरील जागा रिक्त राहिल्या आहेत, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली.

मराठी या अभ्यामंडळासाठी डॉ. दत्तात्रय पाटील आणि डॉ. उदय जाधव यांना समान मते पडल्यामुळे चिठ्ठीद्वारे अंतिम निर्णय घेण्यात आला. यामध्ये डॉ. पाटील विजयी झाले. अर्थशास्त्र विषयासाठी डॉ. अनिलकुमार वावरे आणि डॉ. निवास जाधव यांच्यामध्ये लढत झाली. यामध्ये डॉ. वावरे यांना १० तर जाधव यांना शून्य मते मिळाली.

जनसंपर्क कक्ष
3 APR 2018 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ अभ्यासमंडळ अध्यक्षपदाच्या निवडी बिनविरोध

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील अभ्यास मंडळाच्या निवडी बिनविरोध झाल्या. मराठी अभ्यासमंडळाच्या अध्यक्षपदी डॉ. दत्तात्रय पाटील व डॉ. उदय जाधव रिंगणात होते. दोघांना समान मते मिळाली. डॉ. पाटील चिठ्ठीवर विजयी झाले. समाजशास्त्र, मानसशास्त्र, सिव्हिल इंजिनिअरिंग अँन्ड टेक्नॉलॉजी, इलेक्ट्रीकल इंजिनिअरिंग अँन्ड टेक्नॉलॉजी या विभागांचे अध्यक्षपद रिक्त आहे.

**अभ्यासमंडळाचे अध्यक्ष :** मानवविज्ञान अभ्यास विद्याशाखा: डॉ. राजेंद्र भोसले (हिंदी), डॉ. संभाजी भांबर (इंग्लिश अँन्ड लिंग्विस्टीक), प्रा. डॉ. भारती पाटील (राज्यशास्त्र), डॉ. अवनिश पाटील (इतिहास). विज्ञान व तंत्रज्ञान अभ्यासमंडळाच्या अध्यक्षपदी डॉ. एच. एच. ठकार (गणित), डॉ. डी. एन. काशीद (संख्याशास्त्र), डॉ. पी. एस. पाटील (पदार्थ विज्ञान), डॉ. जी. एस. गोकावी (केमिस्ट्री अँन्ड केमिकल इंजिनिअरिंग), डॉ. अख्तर शेख (इलेक्ट्रॉनिक्स सायन्स, इलेक्ट्रॉनिक्स इंजिनिअरिंग अँनड टेक्नॉलॉजी), डॉ. हरिनाथ मोरे (फार्मसी), आंतरविद्याशाखीय अभ्यासमंडळाच्या अध्यक्षपदी डॉ. एस. व्ही. काळेबाग (शिक्षणशास्त्र), वाणिज्य व व्यवस्थापन अभ्यासमंडळ : डॉ. ए. एम. गुरव (कॉमर्स), डॉ. सारंग भोला (मॅनेजमेंट), प्रा. एस. एस. महाजन (अकौंटन्सी), डॉ. डी. के. मोरे (बिझनेस इकॉनॉमिक्स) यांची निवड झाली.